# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद  **P.S.(ठाणे):** आनंदनगर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0101  **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/03/2024 03:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 18/03/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/03/2024
      **Time From (वेळेपासून):** 16:12 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 19:12 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 19/03/2024  **Time (वेळ):** 03:13 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 011
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/03/2024 03:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** येवले अमतुल्य हटेलचे समोर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** आनंदनगर
   **District(State) (जिल्हा(राज्य)):** उस्मानाबाद(महाराष्ट्र)



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणार):

(a) **Name** (नाव): [illegible]

(b) **Father's/Husband's Name**(वडीलांचे / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1977

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्त्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा जेवळी ता लोहारा जि धाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा जेवळी ता लोहारा जि धाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8605572796

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्रं.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बुध्दभुषण दिलीपराव माणे | | | 1. राउंबरे गल्ली धाराशिव, आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र, भारत |
| 2 | शाहबाज शफीक सय्यद | | | 1. रा आगडगल्ली धाराशिव , आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3200/रूपये ज्यात 500रुपये दराच्या 6चलनी नोटा व 200रु दराची 1चलनी नोट | 3,200.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,200.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत **):**

-: फिर्याद :-

मी संजय हिरामण राठोड, वय 47 वर्ष, व्यवसाय- सेक्युरिटी गार्ड, युनिसेक कंपनी, घोरपडी, पुणे, रा.जेवळी, ता. लोहारा, जि.धाराशिव, मो.नंबर 8605572796

मी आज दिनांक 18.03.2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे पोलीस निरीक्षक, श्री राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचे समक्ष हजर राहुन माझी तक्रार दिली होती. त्यातील थोडक्यात हकीकत अशी की, माझा मुलगा नामे सुरज संजय राठोड हा लातुर येथे शिक्षण घेत आहे. त्याचे शिक्षणासाठी मला जात वौधता प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने दिनांक 20.12.2023 रोजी माझा मुलगा सुरज व माझा भाऊ रमेश राठोड असे सेंट्रल बिÜल्डग धाराशिव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन येथे गेले होते. तेव्हा त्यांनी माझा मुलगा संजय याचे नावे सेंट्रल बिÜल्डग येथील ऑनलाईन सेंटरवरुन जात वौधता प्रमाणपत्रासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र समिती, धाराशिव यांना अर्ज केला होता. सदरचा अर्ज केल्यानंतर सदर ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत, बोनाफाईड सर्टिफिकेट, विठ्ठलसाई कनिष्ठ महाविदयालय, नाईकनगर यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी करणे बाबतचे पत्र, जात प्रमाणप्रत छायांकित प्रत, शाळेचा प्रवेश निर्गम उतारा, 100 रुपयाचे बॉन्डवर शपथपत्र, वंशावळ व 100/- रुपये ऑनलाईन चलन भरलेली पावती ईत्यादी कागदपत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, धाराशिव येथील जात पडताळणी कार्यालयातील माने साहेब यांचेकडे जमा केले होते. तेव्हा माने साहेब यांनी जात वौधता प्रमाणपत्र तयार झाल्यानंतर तुम्हाला मोबाईलवर पाठवतो असे म्हणाले बाबत मला मुलगा सुरज व भाऊ रमेश याने सांगितले होते.

मी दिनांक 15.03.2024 रोजी धाराशिव येथे आल्यानंतर मी माझा भाऊ रमेश याचेकडुन माने साहेब यांचा मोबाईल नंबर घेवुन माने साहेब यांना त्यांचे मोबाईलवर फोन करुन माझे मुलाचे जात वौधता प्रमाणपत्राची ऑनलाईन प्रिंटर काढली असता त्यावर Signature Not Verified येत असल्याने मी त्यांना त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी तुमच्या मुलाचे जात वौधता प्रमाणपत्र तयार आहे परंतु त्यावर आणखी डिजिटल सही झालेली नाही. तसेच तुमचा मुलगा फक्त कागदपत्र जमा करुन गेला आहे, बाकीच काहीच दिल नाही असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ऑफिसला आहेत का आज असे विचारले असता त्यांनी माझी तब्बेत खराब आहे, आज मी कामावर येणार नाही. त्यामुळे तुम्ही सोमवारी 5000/- रुपये घेवुन या, तुम्हाला डिजिटल सही झालेले जात वौधता प्रमाणपत्राची ऑनलाईन प्रिंटर काढुन देतो असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 5000/- रुपये जास्त होतेत काहीतरी कमी करा असे म्हणालो असता त्यांनी तुम्ही या सोमवारी बघु असे म्हणाले होते. तेव्हा मी त्यांना ठिक आहे सोमवारी येतो असे म्हणालो होतो. अशी सविस्तर तक्रार दिली होती.

वरील प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राठोड यांनी माझी व दोन शासकीय पंच श्री हनुमंत संपतसिंग ठाकुर, कनिष्ट लिपिक, बांधकाम विभाग, धाराशिव व गोरख नवनाथ विरगट, भांडारपाल, बांधकाम विभाग, धाराशिव यांची तसेच त्यांचे सोबत असलेले स्टाफमधील कर्मचारी पोहेकॉ/ जाधव, पोशि/डोके यांचेशी आपसी परिचय करुन दिला. तसेच पोनि राठोड यांनी पंच क्रमांक 1 म्हणुन हनुमंत ठाकुर व पंच क्रमांक 2 म्हणुन गोरख विरगट यांची निवड केली. त्यानंतर राठोड साहेब यांनी मला माझी तोंडी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तोंडी तक्रार



Scanned with CamScanner

दोन्ही पंचासमक्ष सांगितली व ती संगणकावर टंकलिखित केली. संगणकावर टंकलिखित केलेली माझी तक्रार मी पुन्हा वाचुन बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर मी व राठोड साहेब यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर सदरची तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली. मी सांगितलेली तोंडी व संगणकावर टंकलिखित केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार पोनि राठोड साहेब यांनी स्वत:कडे ठेवुन घेतली.
त्यानंतर पोनि राठोड साहेब यांनी मला दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, माझ्याकडे माझे तक्रारीमधील नमुद कामासाठी माने साहेब हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत आज दिनांक 18.03.2024 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोहेकॉ जाधव यांनी त्यांचेकडील एका काळया रंगाच्या ब्ॅग मधुन Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये 32 GB चे नवीन S◌anDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णन नमुद असलेले मेमरी कार्ड टाकले व राठोड साहेब यांनी कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार व माने साहेब यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. पोहेकॉ जाधव यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून देण्यात आली.

त्यानंतर मला माने साहेब हे कोठे भेटतील याबाबत विचारले असता मी त्यांना माने साहेब हे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती धाराशिव येथे त्यांचे कार्यालयात भेटतील असे सांगितले. त्यावरुन पोनि राठोड साहेब यांनी मला सुचना केली की, मी पंच क्रमांक 1 ठाकुर यांना सोबत घेवुन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती येथे जावुन त्यांची भेट घ्यावी. त्यांना स्वत:चे कामाबाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे सांगितले. तसेच पंच क्रमांक 1 ठाकुर यांना देखील सुचना दिल्या.

त्यानंतर राठोड साहेब यांचे सुचनेवरुन पोहेकॉ जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन ठेवुन दिले. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 यांना माझेकडील हिरो कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम.एच.25 ए.डी.8841 ने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती धाराशिव येथे गेलोत. तेथे मी माने साहेब यांना फोन करुन कोणती बिÜल्डग अशी विचारणा केली तेव्हा त्यांनी आंबेडकर भवन असे सांगितले. त्यावरुन आंबेडकर भवन येथे जावुन पुन्हा माने साहेब यांना फोन केला. तेव्हा त्यांनी दहा मिनिटात आलो असे म्हणाले. त्यानंतर थोडयावेळाने माने साहेब त्यांचे कार्यालयात आले असता त्यांची भेट घेवुन त्यांना मी तस कस हा बघीतले.. ते हेच्यामधीपण हे केलाव व्हॉटसअ◌ॅपमधील काढली.. तर असला पिं◌्रट यायली.. त्यावर क्वेशन मार्क यायलय.. अश्या आशयाचे आमचेत बोलणे झाले. तेव्हा माने साहेब यांनी त्यांचे कार्यालयातील सरांना (शिपाई यांना) दोनशे रुपये दया.. तुम्हाला कलर पिं◌्रट पाहिजे असाल ना तिथं कोर्टाच्या जवळ जावा.. सांगतो मी फोन करुन.. स्वामी म्हणुन आहेत तिथं.. सरांचे दोनशे रुपये दया असे म्हणुन त्यांचेसाठी काय करायचं ते करा.. ऑनलाईन करता आल असतं तर चक्कर वाचली असती.. असे म्हणुन काम पुर्ण करायला चार पाच हजार रुपये घेताव असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना पाच हजार लई जास्त होतेत .. सर गरीब माणुस हाव .. तीन हजार रुपये .. दोन आडीच हजार घ्या सर.. असे म्हणालो. तेव्हा ते नाही वो..तीन दया असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना दहा मिनिटात काढुन घेवुन येतो असे म्हणालो. तेव्हा त्यांनी ऑनलाईन नाही का असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना नाही आलो पाच मिनिटात काढुन असे म्हणुन त्यांचेपासुन मी व पंच क्रमांक 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत.

त्यानंतर पोहेकॉ जाधव यांनी माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर काढुन राठोड साहेब यांचे ताब्यात दिले. त्यांनी ते घेवुन बंद केले व मला बाजुच्या रुममध्ये थांबण्यास सांगितले. लगेच थोडया वेळात मला जवळ बोलावुन हकीगत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीगत पंच क्रमांक 02 यांचे समक्ष सांगितली. माने साहेब यांनी माझा मुलगा सुरज संजय राठोड यांचे डिजिटल सही झालेले जात वैधता प्रमाणपत्राची ऑनलाईन पिं◌्रट काढुन देण्यासाठी माझेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती स्वत:साठी 3000/- रुपये व कार्यालयातील शिपायासाठी म्हणुन 200/- रुपये असे एकुण 3200/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सदरची लाच रक्कम लाचलुचपत विभागाकडे देण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर पोनि राठोड साहेब यांनी सांगितले की, सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यांचे सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिजवस्तु त्यांचे कार्यालयातील टेबलवर काढुन ठेवल्या. त्यानंतर मी काढुन ठेवलेल्या चिजवस्तु व्यतिरिक्त इतर काही माझेकडे नसल्याची खात्री करुन मी हजर केलेले 3200/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 6 व 200/- रुपये दराची एक चलनी नोट यांना अँन्थ्रासीन पावडर लावणे, अँन्थ्रासीन



Scanned with CamScanner

पावडरचे उपयोग, अल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म , त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोशि डोके यांनी लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिल्या व उर्वरीत वस्तु परत केल्या असता त्या मी माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये, मोबाईल शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिला. त्यानंतर लाच स्विकृतीनंतर डावा हात केसावर समोरुन मागे फिरविणे बाबत ईशारा मला नेमुण दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राठोड यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोनि राठोड साहेब यांच्या सांगण्यावरुन पोहेकॉ जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णन नमुद असलेले मेमरीकार्ड टाकले. सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे शर्टचे आत बनियनला पिनने लावुन पंच क्रमांक 1 यांचेसह मला माझेकडील मोटार सायकलने रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील रवाना झाले. मी व पंच क्रमांक 1 असे माझेकडील मोटार सायकलने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात जावुन माने साहेब यांची भेट घेतली. तेव्हा माने साहेब यांनी सदरची लाच रक्कम स्वामी झेरॉक्स सेंटरवाला याचेकडे देणे व झेरॉक्स तेथुन काढणे बाबत सांगितले. त्यावरुन मी व पंच क्र 1 असे परत ला.प्र.वि.कार्यालय, धाराशिव येथे आलोत. तेथुन परत थोडया वेळानंतर पुन्हा पंच क्र. 1 व मी असे माझेकडील मोटार सायकलने कोर्टाच्या शेजारी स्वामी यांची भेट घेण्यासाठी रवाना झालोत. सदर ठिकाणी गेलो असता सदरचे झेरॉक्स सेंटर बंद असल्याने स्वामी यांना फोन करुन माने साहेब यांनी तुमच्याकडुन झेरॉक्स काढायची होती आणि माने साहेबांनी पौसे दयायला सांगितलेत असे म्हणलो असता त्यांनी दुकान बंद केले आहे, उदया सकाळी या असे म्हणाले. त्यावरुन मी पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे परत आलो. तेव्हा जाधव साहेब यांनी राठोड साहेब यांचे सांगण्यावरुन व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन राठोड साहेब यांचे ताब्यात दिले. त्याचवेळी माने साहेब यांनी मला माझे मोबाईलवर फोन करुन कोर्टाचे समोर भेटण्यासाठी या असे सांगितले.

त्यावरुन पोहेकॉ जाधव यांनी राठोड साहेब यांचे सांगणेवरुन पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे शर्टचे आत बनियनला पिनने लावुन पंच क्रमांक 1 यांचेसह मला माझेकडील मोटार सायकलने माने साहेब यांची भेट घेण्यासाठी कोर्टाकडे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील रवाना झाले. तेव्हा मी व पंच असे कोर्टाचे समोरील पान टपरीवर जावुन माने साहेब यांची भेट घेतली. तेव्हा आमचेत कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. दरम्यान माने साहेब यांनी मला लाच रक्कम पान टपरीवाल्याकडे देणेबाबत सांगितले. तेव्हा मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील नोटांची घडी उजवे हाताने काढुन बत्तीशे रुपये हायत म्हणुन पानटपरीवाल्याकडे दिली असता त्याने ती उजवे हाताने घेवुन दोन्ही हाताने मोजुन लाकडी ड्राव्हरमध्ये ठेवली. तेव्हा मी मला नेमुण दिलेला ईशारा केला. ती वेळ साधारणत: 19.12 वा.ची होती. मी ईशारा केल्यानंतर लागलीच पोनि राठोड तसेच पंच क्रमांक 2 व साप

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
SATYAWAN LAXMAN AGARKAR
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): HEMANT POPATRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे
आनंदनगर,धाराशिव



Scanned with CamScanner